जमादार, कारकून (क्लार्क), मुन्सिफ (न्यायाधीश,) पट्टेवाला, ये उर्दू शब्द मराठीमें प्रचलित हैं। मास्टरको मास्तर, शिक्षक आदि शब्द मराठीमें रायज हैं । व्यवस्थापक, मंत्री (चिटणीस), अध्यक्ष आदि शब्द हिंदीके अनुसारही मराठीमें चलते हैं । प्रस्तावको ठराव कहते हैं । कर्मचारियोंके संबंधमें अधिकतर फारसी शब्द हिंदी और मराठीमेंभी जारी हैं। जाहिरात (इश्तेदार), परिपत्रक (सर्क्युलर), मुख्य वक्ता, अनुमोदन, आभार, विज्ञप्तिपत्र आदि शब्दोंमें विशेष फरक नहीं है । सुझाव को सूचना, संशोधनको उपसूचना आदि शब्दोंमें कुछ फरक पाया जाता है; परंतु उक्त शब्द दोनों भाषाभाषी समझ सकते हैं।

भारतवर्षमें फारसी और अंग्रेजी भाषाका राज्य कई वर्ष चलता था। इसलिये फारसी और अंग्रेजी राज्यशास्त्रविषयक शब्द आजभी प्रचलित हैं। शिवाजी राज्यकालमें फारसी शब्दोंपर बहिष्कार डाला गया था। उन दिनोंमें मराठी भाषामें उर्दूका राज्यशास्त्रकोषभी प्रकाशित हुआ था । परंतु फिरभी अभीतक कुछ उर्दू शब्द रायज हैं ।

तालुका, जिला, गाँव, शहर, कसबा आदि शब्द मराठीमेंभी प्रचलित हैं। इन्स्पेक्टर, इन्क्वायरी आदि प्रचलित अंग्रेजी शब्द मराठीमेंभी हैं। मात्र इन शब्दोंके उच्चारणमें विशेषरूपसे हिंदी भाषामें फरक पाया जाता है।

सभा, समिति, संगठना, पक्ष, घटना, प्रस्ताव आदि सभाविषयक सभी शब्द मराठीमें जारी हैं। घर, गली, मोहल्ला, सडक, रास्ता, आदि शब्द मराठीभाषी समझ लेते हैं।

संस्कृतके अतिरिक्त किसीभी भारतीय भाषाका समूचे भारतवर्षमें प्रचार न होनेके कारण किसीभी एक भाषाका राज्य संपूर्ण भारतवर्षमें न चल सका था। परंतु अब वह असुविधा दूर हुई है। समुचे भारतवर्षमें हिंदी बोली तथा समझी जाती है। अतः भारतीयताकी परंपरा पुनः दृढ

करनेमें हिंदी द्वारा हम कटिबद्ध हो चुके हैं। मराठी भाषाभाषियोंके लिये हिंदी आसान है। सभी देशी भाषाएँ संस्कृतोत्पन्न होनेसे हिंदी भाषा यदि संस्कृतप्रचुर रही तो सभी प्रांत, हिंदी भाषा न सीखते हुएभी समझ सकेंगे। राज्यशासन और विज्ञानशास्त्र की शब्दावलि संस्कृतोद्भवही हो सकती है यह अब प्रकट हो चुका है। अन्य प्रांतीय या उर्दू आसान शब्दोंका उपयोग करनेसे हिंदी शब्दभंडार अवश्य संपन्न होगा।

मददगार, कचहरी (कचेरी), खटला या केस, दावा, पक्षकार, प्रतिपक्षी, नौकर, अधिकारी आदि शब्द मराठी भाषामें हैं।

समाज तथा राज्यशासनके संबंधमें जिन मराठी प्रतिशब्दोंकी आवश्यकता थी वे कुछ शब्द यहाँ दिए गये हैं। शेष हिंदीके अनुसारही मराठीमें चालू हैं।

* * *

५० : : गोग्रास

[इस कहानीमें मराठी भाषा का आविष्कार आप पाएँगे। अनुवाद करनेका यत्न करें। समालोचनासे कथाका भाव जान लीजिये।]

चार कच्चींबच्चीं, पांच पंचवीस रुपयांचें सामानसुमान व मंगळसूत्र याव्यतिरिक्त रागिणीच्या नवऱ्यानें घरांत कांहींहि शिल्लक ठेविलें नव्हतें. रागिणी मात्र चलाख व येईल त्या परिस्थितीशीं टक्कर देणारी होती. जन्मच मुळीं तिचा हाल-अपेष्टांत गेला होता. दुःखाकष्टांची तिला संवय झाली होती.

शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या आश्रयावर चार दोन महिने कसेबसे तिनें काढले. शिकलीसवरलेली नसल्यामुळें मोलमजुरी करणें तिला प्राप्त झालें होतें. प्रथम ती कथा-पुराणाच्या रूपानें देवालयांत जाऊन बसूं लागली. अनेक आया-बहिणींच्या ओळखीपाळखी करून घेऊन

आपल्यावर गुदरलेल्या संकटांची तिनें त्यांना जाणीव करून दिली. त्यांचीं हृदयें कळवळून आलीं. आपल्या ओळखीपाळखीनें रागिणीच्या मैत्रिणींनीं तिला स्वैंपाकिणीची नोकरी लावून दिली.

रागिणीवर सोपविलेलीं कामें ती नेटनेटकीं करीत असे; परंतु मालकी आविर्भावामुळें तिचा क्वचित् प्रसंगीं अपमान होऊं लागला, आणि म्हणून रागिणी दुसरीकडे नोकरी शोधूं लागली. आतांपर्यंत तिनें सुमारें पंचवीस नोकऱ्या केल्या होत्या. मात्र प्रत्येक घरच्या मालक-मालकिणीला तिनें दुखावलें नाहीं किंवा त्यांची अवकृपाहि होऊं दिली नाहीं. यामुळें स्वैंपाक जरी सुटला असला तरी सर्व मालकिणीं-कडे रागिणीची ये–जा सुरू असावयाची.

रागिणीचीं मुलें आतां मोठीं झालीं होतीं. पांच माणसांचा खर्च सांभाळण्यास रागिणी असमर्थ ठरूं लागली. शिवाय तिचें वयहि झालें होतें. पन्नाशीच्या घरांत ती गेली होती. मुलांच्या शिक्षणाचा खर्चहि वाढत होता. रागिणीनें आपल्या घरीं आतांशा एक गाय बाळगली होती ! हाच तिचा मुख्य उद्योग झाला होता.

श्रीमंतांच्या घरांमधून तडानेल्या भुकेलेल्याला जरी अन्न आणि पाणी मिळत नसलें तरी पूजेला ब्राह्मण, गाईला गोग्रास घालण्यास ते विसरत नाहींत. दिवसेंदिवस गाई कमी होऊं लागल्या होत्या आणि म्हणून रागिणीच्या गाईला पन्नासपर्यंत गोग्रास मिळूं लागले. आपली नोकरीचाकरी संपल्यावर गोग्रास गोळा करीत करीत रागिणीला घरीं येण्यास ४–५ वाजावयाचे. हाच तिचा मुख्य उद्योग झाला होता.

कित्येक प्रसंगीं बायकांनीं रागिणीला गोमूत्र, गोदूध, गाईचें शेण मागितलें होतें. परंतु रागिणी तें देऊं शकत नव्हती. गोपूजेच्या दिवशीं आळींतील सर्व बायकांनीं गाईची पूजा करण्याचें ठरविलें; परंतु त्यांना गाय कुठेंच सांपडेना. शेवटीं एका बाईला रागिणीच्या गाईची आठवण

झाली. पण रागिणीचें घर कुणालाच माहीत नव्हतें. बायकांत चाललेली कुजबूज एका म्हाताऱ्यानें ऐकली व ' मी रागिणीचें घर शोधून गाईला घेऊन येतों ' असें तो म्हणाला व लगेच रागिणीच्या घराच्या शोधार्थ तो निघालाहि.

संध्याकाळची वेळ होती. रागिणी गोग्रास गोळा करीत करीत सहाच्या सुमाराला घरीं पोंचली. ती हल्लीं फारच थकल्यामुळें तिच्या हातून कामें होत नसत. म्हाताराहि तिच्या पाठोपाठ घरीं पोंचला. पण—

म्हाताऱ्यानें घरांत पाऊल टाकतांच ' आई ! भूक लागली ग ! ' करीत ४—५ मुलें तिच्याभोंवतीं गिल्ला करून गोग्रासांवर तुटून पडलीं.

म्हातारा मागच्या पावलीं परतला. भुकेनें व्याकुळ झालेल्या मुलांचें तें दृश्य पाहून त्याला गहिंवरून आलें. रागिणीच्या गाईचें वर्तमान सांगण्यास तो असमर्थ ठरला. रागिणी पुन्हा गोग्रास न्यावयास येऊं शकली नाहीं व रागिणीचे चार लाल भूकभूक, तहान तहान करून स्वर्गस्थ झाले.

श्रीमंतांच्या गोग्रासाचा प्रश्न मात्र सुटला नाहीं !

कठिन शब्दार्थ

शब्द	अर्थ
कच्चींबच्चीं—नपुं.	बालबच्चे
पांचपंचवीस—वि.	पाँचपचास
सामानसुमान—नपुं.	साजोसामान, माल व असबाब
मंगळसूत्र—नपुं.	मंगलसूत्र
शिल्लक—स्त्री.	शेष, बाकी
टक्कर—स्त्री.	सामना
हालअपेष्टा—स्त्री.	दुःख, कष्ट
काढिली—क्रि.	निभाए
शिकली-सवरलेली—वि.	लिखी-पढी
मोलमजुरी—स्त्री.	मजदूरी
कथापुराण—नपुं.	भजनपूजन
आयाबहिणी—स्त्री.	माँ बहनें
ओळखीपाळखी—स्त्री.	जानपहचान
गुदरणें—क्रि.	बीतना
जाणीव करून देणें—	जानकारी देना

शब्द अर्थ	शब्द अर्थ
संवय–स्त्री· आदत	कळवळणें–क्रि· मसोसना
शेजारीपाजारी–पुं· आडोसी-पडोसी	स्वयंपाकीण–स्त्री· रसोई पकानेवाली
कशीबशी–किसी हालतमें	सोंपविणें–क्रि· सौंपना
सुमारें–लगभग	नीटनेटकी–वि· साफसुथरी
केल्या–बजा लाईं	सांपडणें–क्रि· पाना, मिलना
दुखविले–कष्ट दिये	आठवण झाली–स्मरण हुआ
सुटणें–क्रि· त्यागना, मुक्त होना	कुजबुजणें-क्रि· कानाफूसी करना
जा-ये–आ जा	शोधणें–क्रि· ढूँढना
आतांशा–आजकल	लगेच–अव्य· तुरंत
भुकेलेल्याला–भूखोंको	भोंवतीं–अ· इर्दगिर्द
दिवसेंदिवस–दिन, प्रतिदिन	गिल्ला–पु· गडबड, शोर
वाजावयाचे–बजते थे	तुटून पडलीं–झपट पडे
शेण–नपुं· गोबर	मागच्या पावलीं–दबे पाँव
आळी–स्त्री· मोहल्ला, गली	परतला–क्रि· लौटा
	गहिंवरून–उमडकर

* * *

५१ : : 'गोग्रास' की समालोचना

[पाठके भावको समझानेके हेतु पाठकी समालोचना दी गयी है। इसकी सहायतासे पाठका भावानुवाद कीजिये। रागिणीका चरित्र चित्रण मराठीमें कीजिये।]

पाठका शीर्षक 'गोग्रास' है। शीर्षकसेही हम यह अनुमान लगा सकते हैं कि इस कहानीमें उन्हीं महानुभावोंका चित्रण होगा जो सनातन होनेका ढिंढोरा पीटते हैं। या जो कहते हैं कि रूढी या रिवाजके

आधीन जो समाज हुआ है और सनातनत्वका दावा करता है उस समाजका यह रेखाचित्र है।

कहानी मराठीमें है। कहानीमें लोकभाषाका आविष्कार प्रत्येक वाक्यमें दीख पडता है। थोडेमें, अपने भावोंको सुस्पष्ट कर, दौलतमंद और दरिद्र जीवनका यथायोग्य वर्णन करनेसे कहानी स्वयं परिचय करा देनेमें समर्थ हुई है।

रागिणी का शरीर बिलकुल क्षीण बतलाया गया है। मन बहुतही तगडा। फिरभी मानसिक कमजोरीका विश्लेषण यदि पाठमें किया जाता तो अधिक अच्छा होता था। कहानीका अंत बहुतही अधूरे वाक्योंमें किया गया है। इन वाक्योंसे ज्ञात होता है कि अपने छोटे छोटे बालकोंके लिये रागिणीने कितने कष्ट उठाये हैं। कष्ट सहकर भी वह अपने बच्चोंका पालपोस करनेमें असमर्थ साबित हुई है। समाजकी निर्दयताका एक बढिया उदाहरण रागिणीके जीवनक्रमसे पाठकोंको ज्ञात होगा। साथ साथ सनातनी होनेका जो दावा करते हैं उनके लिये यह कहानी आदेश देती है कि गरिबोंको अपनी मेहनतसे जीने दो–इसीमें सनातनत्व है, अमरत्व है।

भाव—यद्यपि रागिणीके घरमें गौ नहीं थी परंतु फिरभी गौका बहाना बनाकर वह गोग्रास अिकट्ठा करती थी। केवल अिसीलिये कि गोग्रासकी धार्मिक भावनासे अपने परिवारका पालन पोषण हो। बालबच्चे कमसे कम एक जून क्यों न हो अधपेट रह सकें। 'गोग्रास' यह एक मात्र उसके परिवारका जीवन बन गया था। इसीलिये वह रसोयाका काम करती थी। शरीरने जब जवाब दे दिया और साथ साथ घरमें गौ नहीं है यह बात जब लोगोंके सामने प्रकट हुई तब अनायास उसके बालबच्चे मर गये। मात्र धनवानोंको दुःख हुआ कि हम गौको गोग्रास न खिला सके।

कहानीमें रागिणीका पात्र मूक चित्रित किया गया है। उसके जीवनपर एक बहुतही अच्छी और लंबी चौडी कहानी लिखी जा सकती है और वह बहुतही आवश्यक और उपयोगी सिद्ध हो सकती है। लेखकने इस कहानी का विस्तृत चित्रण करनेका कार्य पाठकोंको सौंपा है।

* * *

५२ : : इतिहास

शिवापूर फारच लहानसें खेडें होतें. अवघें दोन हजार वस्तीचें. शाळा नाहीं, वाचनालय नाहीं, रुग्णालय नाहीं किंवा कोणत्याहि संस्था नाहींत. तरी पण त्या खेड्याचें आरोग्य उत्तम होतें. लोकांत पुस्तकी ज्ञानाची वाढ जरी झाली नसली तरी लोक संघटित व कष्टाळू होते. मुलें, पुरुष, बायका सर्वच कामें करीत असत. सर्वांची प्रकृति धडधाकट होती.

जागतिक सुधारणेचें लोण शिवापुरींहि कांहीं अंशानें पोहोचलें होतें. रात्रीची एक शाळा नुकतीच निघाली होती. नवाकाळ नांवाचें साप्ताहिकाहि शिवापुरांत येऊं लागलें होतें. गांवांतील चार-दोन म्हातारीं माणसें आपल्या अनुभवाचे धडे गांवांतील सर्व लहान-मोठ्या मंडळींना देत असत. हीं म्हातारीं माणसेंच गांवांतील पंच मंडळी होती. त्यांच्या आदेशाप्रमाणें सर्व गांवकरी वागत. येवढीच सुधारणा या गांवांत झाली होती.

गांवांत एक विहीर होती व एक नदीहि होती. लहान लहान टेकड्यांच्या रांगांनीं गांवाची शोभा वाढविली होती. इतिहासांत जसें हें गांव गाजलें तद्वतच ३०, ३२, ४२ च्या चळवळींतहि या गांवानें आपली ऐतिहासिक भूमिका सार्थ केली होती.

पंजाब, काश्मीर, बंगाल, हैदराबाद आदि ठिकाणीं भीषण हत्याकांड होऊनसुद्धां खुद्द शिवापूर गांवांत कसलीहि गडबड झाली नव्हती. उलट गांवांतील मंडळींनीं एकजूट करून त्या प्रांतांना साहाय्यच केलें. कांहीं निर्वासित शेतकऱ्यांना शेती देऊन त्यांच्या मुलांबाळांची जन्माची सोय केली.

देशपांडे हे सर्वांत जुने गांवकरी होते. देशपांडे घराण्याचा विस्तार खूप मोठा वाढला होता. परंतु त्यांच्यांत फूट पडली नव्हती. वांटण्या झाल्या नव्हत्या. देशपांडे मंडळी जातीनें ब्राह्मण जरी असली तरी गांवांतील बहुजन समाजांत तीं एकरूप झालीं होतीं. स्वतः जातीनें ते शेतकी करीत असत. शेतकऱ्याच्या सुखदुःखांत ते गढून गेले होते.

प्रकाश, हवा, पाणी व शेती यांचा संपूर्ण सदुपयोग गांवकरी घेत असत. विलायती नांगर गांवांत आले नव्हते. मात्र कुठलीहि शेती नांगराच्या अभावीं पडून राहात नसे. सर्व शेतकरी व मजूर सहकार्यानें उद्योगधंदा करीत असत.

श्रीमंत, व्यापारी, वकील, डॉक्टर, यांनीं शिवापूरला भेटी देऊन आपला उद्योगधंदा वाढविण्याचा यत्न केला; परंतु त्यांची तेथें डाळ शिजली नाहीं.

कारण गांवांत भांडणें नव्हतीं. सहसा कोणी आजारी पडत नसत. आजारी पडले तरी देशी औषधांचा ते उपयोग करीत असत. शिवाय जीवनांत अडून राहील अशी एकहि वस्तु व्यापाऱ्यांकडून घेण्याची गरज त्यांना नसे.

कठिन शब्दार्थ

शब्द	अर्थ	शब्द	अर्थ
खेडें—नपुं.	ग्राम	रांग—स्त्री.	कतार, पंक्ति
अवघें—वि.	केवल	गाजणें—क्रि.	मशहूर होना
वस्ती—स्त्री.	लोकसंख्या, आबादी	ठिकाण—नपुं.	स्थान

शब्द	अर्थ
कोणतीहि	अव्य. कोईभी
तरी पण	अव्य. यद्यपि, परंतु, फिरभी
वाढ	स्त्री. उन्नति
धडधाकट	वि. सुदृढ
सुधारणा	स्त्री. सुधार
लोण पोहोंचविणें	समस्या भिडाना
कांहीं अंशानें	किसी अंशमें
नुकतीच	अव्य. थोडेही दिनोंमें
देत असत	क्रि. देते थे
गांवकरी	पु. ग्रामीण
वागणें	क्रि. बरतना
विहीर	स्त्री. बावडी
पडून राहात नसे	विना जोते न रहती थी
भेट	स्त्री. भेंट, मुलाकात
डाळ शिजली नाहीं	दाल नहीं गली

शब्द	अर्थ
गढून	मग्न होकर
खुद्द	अव्य. स्वयं
गडबड	स्त्री. गडबडी
झाली नव्हती	क्रि. न हुई थी
उलट	अव्य. विरोधमें, अपितु
एकजूट	स्त्री. संगठना
सोय	स्त्री. प्रबंध
फूट	स्त्री. विद्रोह, मतभेद
वांटणी	स्त्री. भाग, हिस्सा
जातीनें	स्वयं
पुरी झाली ऊसली तरी	पूर्ण होने-पर भी
नांगर	पु. हल
अडून राहील	रुक सकेगी
गरज	स्त्री. आवश्यकता, जरूरत
भासणें	क्रि. प्रतीत होना, महसूस करना

* * *

सणांची योजना एका विशिष्ट उद्देशानें केलेली असते. प्रत्येक सणाच्या मागें फार मोठा इतिहास असतो. तो इतिहास विसरून केवळ गोडधोड खाणें व चैन करणें हेंच जेव्हां समाज आचरतो तेव्हांच खरें त्या सणाचें महत्त्व नष्ट होतें. गोड खाणें, चैन करणें व लोळत पडणें, हें सणांचें मुख्य लक्षण नसून ज्याकरितां सणांची आयोजना केली असेल त्या घटनेचा फेरविचार करणें हा खरा सणांचा हेतु असतो. शिवाय 'जेवढें खाल तेवढें पचवा' हा आरोग्यशास्त्राचा नियमहि आम्ही पाळीत नाहीं.

अत्यंत आणीबाणीच्या परिस्थितींत झाडून साऱ्या शक्ति एकवटून जेव्हां जेव्हां आमच्या पूर्वजांनीं शत्रूवर मात करून विजय संपादन केले तेव्हां तेव्हां ते ते विजयदिन म्हणून सणांच्या रूपानें साजरे झाले. काळ पालटला आहे, परिस्थिति बदलली आहे. आतां तेच सर्वच्या सर्व विजय-दिन पाळण्याचें कारण नाहीं आणि जरी ते पाळले तरी सध्यांच्या रूपांत तर मुळींच पाळले जाऊं नयेत. या सणांचा साधार राष्ट्रीय इतिहास मात्र प्रत्येकानें अवश्य वाचला पाहिजे.

सध्यांचे आमचे राष्ट्रीय सण

२६ जानेवारी--प्रजासत्ताक दिन. ४ मार्च—मार्क्स दिन. १ मे—आंतरराष्ट्रीय कामगार दिन. १० मे—१८५७ स्वातंत्र्य-युद्ध दिन. १ ऑगस्ट—टिळक पुण्यतिथि. ७ ऑगस्ट—टागोर पुण्यस्मृति. १५ ऑगस्ट—स्वातंत्र्य दिन. २ ऑक्टोबर—म. गांधी जयंती. १४ नोव्हबर—जवाहर जन्मदिन. २८ डिसेंबर--कॉंग्रेस जन्मदिन.

याव्यतिरिक्त सुभाषचंद्र बोस, डॉ. आंबेडकर, बॅ. सावरकर आदि राष्ट्रीय नेत्यांचे वाढदिवस पाळले पाहिजेत.

पाडवा, धूलिवंदन, गोकुळअष्टमी, गणेशचतुर्थी, दसरा, दिवाळी आदि सणांचें महत्त्व समजून घेऊन ते पाळणें आवश्यक आहे.

शिवाजी, गुरु नानक, राणा प्रताप, समर्थ रामदास आदि स्वर्गस्थ पुढाऱ्यांच्याहि पुण्यतिथ्या साजऱ्या केल्या पाहिजेत.

उत्सव-समारंभामधून संघटन व राष्ट्रोन्नति हें ध्येयच केवळ डोळ्या-पुढें ठेवलें पाहिजे. मंगल तिथ्या, पुण्यात्मे व राष्ट्रीय महोत्सव भारतांत कमी नसून ते ते समारंभ साजरे करण्यास दिवस कमी आहेत.

कठिन शब्दार्थ

शब्द अर्थ	शब्द अर्थ
सणवार–पु. त्योहार	झाडून–क्रि. समूचे, सर्व
विसरणें–क्रि. भूलना	एकवटून– क्रि. एकत्र होकर
गोडधोड–वि. मीठा	पूर्वज–पु. पुरखा
लोळणें–क्रि. लेटना	मात करणें–क्रि. विजय पाना
पाळणें–क्रि. आचरना, रखना	पालटला–क्रि. बीता,
आणीबाणीच्या–वि. नाजूक हालतमें	पाळणें–क्रि. मनाना
ठरणें–क्रि. निश्चय करना	वाढदिवस–पु. जन्मगाँठ

* * *

५४ : : धंद्यांचें राष्ट्रीयीकरण

(मराठी ग्रामीण भाषाका नमूना)

महादू:—धनी ! बारा वर्षं झालीं. माझा पगार है तिथचं है. म्होरल्या वर्सांपासून पगारवाढ झालीच पाहिजे.

शेठजी:—शहरांतल्या मजुरांच्या नादीं लागून खेड्याचेहि मजूर बिघडले आहेत. महादू, मीं पगार वाढविला नाहीं हें खरें; परंतु तूं आजारी पडलास, लग्नाला गेलास, तरी तुझा पगार कापून घेतला का

महादू:—आमाला सुटी तरी कुठं देताव तुमी ? रजा तर बाजूलाच राहिली ! खाडे धरले नाहींत म्हून काय झालं ?

शेठजी:—खाडे धरणें, सुट्या देणें, रजा देणें हें सर्व मला मान्य आहे. पण तूंहि तसें काम करावयास पाहिजे. आम्ही तुमच्यामागें सारखें राहात नाहीं. कामाच्या बाबतींत तुमच्यावरच विश्वास ठेवतों कीं नाहीं ?

महादू:—मग काय झालं ? आमी काय शहराच्या मजुरावानी तासावर काम करीत नाई. सकाळपून सांज होईतवर काम करतों. कामांत कदीबी हयगय व्हायची नाहीं.

शेठजी:—तुझ्या कामाबद्दल मी तरी कुठं तक्रार करतों !

महादू:—जेवडं आमी काम करतों तेवडा पगार मिळाया हवा !

रामा:—शेतांत राबून काळ्याचं पांढरं झालं है माझं, मग मालकानं पगार का चढविला नाहीं. मीबी आतां दुसरीकडं नोकरी धरीन. कुटंबी चार घमेलं टाकायचं व पोटाला खायचं. मग इथंच काय गाठुडं पुरलं है ?

शेठजी:—रामा, तूंहि महादूच्या नादीं लागून बिघडलास वाटतं ? अरे, तुम्ही जर नोकऱ्या केल्या नाहींत तर जग ओस पडलं आहे का आम्हांला ? दुसरे नोकर आम्ही ठेवूं. बाकी खंडूसारखे नोकर विरळा.

रामा:—मालक, खंडूची कशाला बरोबरी करतां ? त्याचा मालकबी तसाच है. लगीन, सनवार समदं तो बगतो. त्याला एक श्यातबी त्याच्या मालकानं दिलं आहे. तो मरमर मरतो; पण त्याचं चीजबी त्येचा मालक करतो.

शेठजी:—तुम्हांला मी कांहीं पगार कमी देत नाहीं. तुम्हांला त्या पगारांत भागवितां येत नाहीं त्याला मी काय करूं ?

खंडू:—फाकडू बोललांत धनी! महादू झाला काय न् रामा झाला काय दोघवी सारखेच. 'आसन त्या दिवशीं दिवाळी व नसन त्या दिवशीं शिमगा.' त्येंच्या खर्चाला सुमारच नाहीं.

शेठजी:—कसं बोललास खंडू! सांग त्यांना जरा समजून.

महादू:—आमी दारू पिऊं, नाहींतर तमाशाला जाऊं; मालकासनी काय करायचं? काम चोख घ्यावं न दाम रोख द्यावा म्हंजे झालं.

दुसरे शेठजी:—तसं नव्हे महादू! तुम्ही कांहीं लोखंडाचें यंत्र नाहीं आहांत. घातलं तेल कीं झालं मशीन चालू किंवा निर्बुद्ध गाढव नाहीं आहांत. तुम्ही माणसं आहांत. माणुसकीनं चाला म्हणजे तुम्हांला देव कांहींहि कमी पडूं द्यावयाचा नाहीं. आमचा खंडू पाहा, राबतो, मिळवितो, सुखानें राहतो.

पाहिला शेठजी:—मी हेंच सांगतों यांना, पण ऐकतात कोठें?

दुसरा शेठजी:—हें पाहा कचरूलाल! सांगण्यासवरण्याचे दिवस गेले आतां. वागण्याचे दिवस आले आहेत. आपलें जेवढें उत्पन्न आहे तें सर्व राष्ट्राच्या मालकीचें आहे. आपण आतां स्वतंत्र झालों आहोंत. आपल्या संपत्तीचा शक्य तितका उपयोग राष्ट्राला करून दिला पाहिजे.

चांगलं खाल्लं पिलं कीं माणसाचीं शरीरं चांगलीं होतात, राष्ट्राचें उत्पन्न वाढतें आणि मग राष्ट्राचें शिक्षण, आरोग्य, धंदा हा सुरळीत चालतो. मानसिक व शारीरिक संपत्ति ज्या राष्ट्राजवळ भरपूर आहे तेंच राष्ट्र उत्तम. भारतवर्ष या दोन्ही दृष्टींनीं संपन्न आहे. तेव्हां आपल्या स्वतःच्या पायापुरतें न पाहतां आपल्या राष्ट्राच्या हिताकडे आतां अधिक बघितलें पाहिजे. गुणांचें चीज करणें व पैशाचा सदुपयोग करणें हें धंद्यांचें राष्ट्रीयीकरण केल्यानेंच साधणार आहे. तुझा पैसा आतां तुझ्या मालकीचा राहिला नसून तो राष्ट्राच्या मालकीचा झाला आहे. त्यांतले मुख्य भागीदार मजूर व शेतकरी हे होत.

कठिन शब्दार्थ

[इस पाठमें ग्रामीण भाषाका प्रयोग किया गया है। अनुमानसे शब्दोंका विकृत रूप समझना आसान है। पर फिरभी ग्रामीण शब्दोंके मराठी प्रचलित शब्द भी अर्थके साथ यहाँ दिये गये हैं।]

म्होरं, पुढच्या–आगामी
वाढणें–बढना
नादीं लागणें–आधीन होना
बिघडणें–खराब होना
खरें–सच
आजार–बीमारी
आठवण होणें–याद आना
हवा–चाहिये
राबणें–मेहनत करना
पांढऱ्याचे काळे–धूपसे सफेद बाल
भागीदार–हिस्सेदार
धरणें–स्वीकारना, पकडना
कुठबी, कोठेंहि–कहीं भी
घमेले–टोकरिया
गाठुडें–गठरी
ओस–वीरान
विरळा–क्वचित्, इनागिना
बरोबरी–तुलना, बराबरी
समदं, सर्वच–सभी
मर मर मरतों–जान तक देता हूँ
बाजूलाच–अलगही
मग काय झालं–फिर क्या हुआ
मजुरावानी, मजुरासारखे–मजदूरोंके अनुसार
हयगय–आनाकानी
व्हायची, व्हावयाची-होनेवाली
तक्रार–शिकायत
मी काय करूं–मैं क्या कर सकता हूं
फाकडु, उत्तम–बहुत अच्छा
आसन, असेल–होगा
सुमार–सीमा
करायचं, करावयाचें–करना है
चोख–चोखा
रोख–नकद
तसें नव्हे–यों नहीं
सांगण्यासवरण्याचे–कहने सुनानेके
सुरळीत–बे रोकटोक, अच्छा
पायापुरतें पाहणें-अपनें तईं सोचना

* * *

५५ : : सहवासोत्तर विवाह

[विवाह और सहवासोत्तर विवाहके संबंधमें महाराष्ट्रकी अवस्था इस कहानीमें ग्रथित की गयी है।]

गरजा वाढलेल्या नि त्या भागविण्याचीं साधनें कमी झाल्यामुळेंच सर्वच समाजाची पण त्यांतल्या त्यांत वधूपित्यांची कोण त्रेधा उडून गेली आहे ! लग्नसराई आली कीं वधूवरसूचक मंडळाचे व वरपित्यांचे उंबरठे झिजवितांना वधूपित्यांच्या नाकीं नऊ येतात.

लग्न होत नाहीं म्हणून शिक्षण चालू व शिक्षण पूर्ण व्हावयाचें म्हणून लग्न रहित. अशा विचारांत मुली बी. ए. एम्. ए. झाल्या तरी त्यांचीं लग्नें म्हणून होत नाहींत, आणि मग मुलगी अधिक शिकलेली व वयस्क म्हणून तिला वर पसंत करीत नाहींत. शेवटीं नाइलाजानें बिजवर, तिजवर, गरीब अथवा अशिक्षित वराबरोबर सुशिक्षित मुलीला लग्न करण्याची पाळी येते. जीवनाच्या गरजा भागवितां येत नाहींत म्हणून तरुणहि लौकर लग्नें करीत नाहींत.

नरहर आय्. सी. एस्. झाला होता. त्रिवेणीहि बी. ए. होती. दोघांनीं जवळ जवळ एक वर्ष एकत्र राहून लग्न केलें होतें. आचारविचार, ध्येय, धोरण आदि विषयांचा सांगोपांग विचार दोघांनींहि केला होता. जाति, गण, गोत्र, आदि नेहमींच्या पद्धतीनें वधूवरांची निवड झाली नसल्यामुळें दोघांचेहि आई, वडील, भाऊ, बहिणी दोघांच्यावरहि असंतुष्ट होत्या.

तारुण्याचा उन्माद ओसरल्यावर, लग्न झाल्यानंतर एक वर्षाच्या आंतच नरहर व त्रिवेणी यांच्यांत मतभेद निर्माण होऊं लागले. कुत्रा बाळगणें, रात्रीं दिवा मालवणें, सकाळीं लौकर उठणें, संडासांत वृत्तपत्रें वाचणें, आदि मतभेदांचीं कारणें पुनः पुनः घडूं लागलीं. दोघेहि नोकर होते. हजार पंधराशें रु. महिना मिळवीत असत. घरांत नोकर-चाकर, बाहेर मानसन्मान परंतु दोघांचींहि मनें मतभेदामुळें खिन्न होऊं

लागलीं. समजूत घालवयास व एकोपा घडवून आणावयास कोणीहि जवळ नव्हतें व तें जवळ येणेंहि शक्य नव्हतें. मतभेदाला व ह्या मतभेदामुळें निर्माण झालेल्या मानसिक खिन्नतेला कंटाळून शेवटीं दोघांनींहि विभक्त व्हावयाचें ठरविलें.

आज सायंकाळीं सोक्षमोक्ष करावा या उद्देशानें त्रिवेणी बागेंत विचारमग्न अवस्थेंत बसली होती. माळीण झाडांना पाणी घालीत होती. माळिणीकडे पाहून तिच्या लहानशा सुखी संसाराचें चित्र त्रिवेणीच्या डोळ्यापुढें उभें राहिलें. नवराबायको, दोन मुलें, दीर व नणंद अशीं सहा माणसें त्या कुटुंबांत होतीं. राहण्यास फक्त एक खोली, कष्टाला सीमा नाहीं. दागदागिने व कपड्यालत्त्यांचें फक्त दर्शन; तेंहि क्वचित् प्रसंगीं घडलेलें. अशाहि स्थितींत माळी आणि त्याची बायको आनंदानें जीवन कंठीत होतीं. त्रिवेणीनें आपल्यासारखेच मतभेद यांच्यांतहि असतील म्हणून माळणीला कांहीं प्रश्न विचारले, परंतु माळीण सर्वस्वीं सुखी असलेली त्रिवेणीला दिसली. "आपलें काम आपण करावें, पुरुषांच्या मध्यें बायकांनीं पडूं नये; वेळेला जेवण वाढलें कीं पुरुष बोलत नाहींत; मी कांहीं नेहमींच नोकरी करीत नाहीं; दोन मुलें खेळतीं आहेत म्हणून करतें; बायका त्या किती मिळविणार?" या माळणीच्या उत्तरांनींच त्रिवेणी भानावर आली. सहवासोत्तर विवाह सार्थ करण्यास शेवटीं माळीण कारणीभूत झाली.

कठिन शब्दार्थ

गरजा—स्त्री. आवश्यकताएं, जरुरतें
भागविणें—क्रि. निभाना
त्यांतल्या त्यांत—उसीमें
कोण त्रेधा—कितनी दुर्दशा
उडून गेली—हुई, होती रही

नाइलाजानें—लाचारीसे
बिजवर—पु.—द्वितीय लग्नेच्छु
सांगोपांग—अव्य. सविस्तर
निवड—स्त्री.—चुनाव
तारुण्याचा—वि.—जवानीका
बहर—वि. बहार

लग्नसराई--स्त्री. ब्याहके दिन
उंबरठा--पु. देहलीज
झिजविणें--क्रि. घिसाना
नाकीं नऊ येणें--नाकमें दम भर आना
राहित--कि.--मुल्तवी
विभक्त--अव्य.--अलग
सोक्षमोक्ष--पु.--निर्णय, अंत
माळीण--स्त्री.--मालन
उभे--अव्य.--खडे
दीर--पु.--भाया, जेठजी
नणंद--स्त्री.--ननद
कपडालत्ता--पु.--कपडावपडा
पडूं नये--न जाना चाहिये
ओसरणें--क्रि.--कम होना
बाळगणें--क्रि. रखना, पालपोसना
मालवणें--क्रि.--बुझाना
समजूत--स्त्री.--समझौता
एकोपा--पु.--एकता, इकाई
कंटाळणें--तंग आना
शेवटीं--अव्य.--आखिरकार
वाढणें--क्रि.--परोसना
बोलणें--क्रि.--कहना, बोलना
खेळती--क्रि.--खिलाडी
मिळविणें--क्रि.--कमाना, प्राप्त करना
भानावर आली--होशमें आई
कारणीभूत--कारण

* * *

५६ : : धाडसी मुलगा

कथा १

[केवल पढाई और अभ्यासके लिये ये कथाएँ दी गयी हैं। मराठी बालवाङ्मय आप पढें। अभ्यस्त बनेंगे।]

कांत नांवाचा एक मुलगा होता. तो अभ्यासांत हुशार होता. आज्ञाधारक असल्यामुळें त्याचे सर्वच जण कौतुक करीत होते. शरिरानें व तसेंच मनानें पण तो घट्टपुष्ट होता.

१९३७ सालीं हैदराबाद राज्यांत वंदे मातरम्‌करितां शाळेंत संप झाला. सर्वपरीनें प्रयत्न करूनहि वंदे मातरम् म्हणण्याला सरकार

अनुज्ञा देईना. तेव्हां राज्यांतील विद्यार्थ्यांच्या मध्यवर्ती मंडळानें सत्याग्रह करण्याचें ठरविलें. कांत हा दहावींत होता. हायस्कूलच्या वतीनें त्याची मध्यवर्ती मंडळांत निवड झाली होती.

कांत दृढनिश्चयी व बाणेदार असल्यामुळें विद्यार्थिवर्गांत तो प्रिय होता. जेव्हां सत्याग्रह सुरू झाला तेव्हां कांत पहिल्या तुकडीचा नेता बनला. या तुकडीचा सरकारनें भयंकर छळ केला. कांतला तर चाबकांनीं बडविलें. परंतु कांत डगमगला नाहीं. उलट दर चाबकागणिक वंदे मातरम् म्हणून आपल्या न्याय्य मागणीचा प्राणपणानें त्यानें पाठपुरावा केला. त्याला एकवीस फटके मारले. बेशुद्ध होईपर्यंत तो वंदे मातरम् म्हणतच होता. जेव्हां तो शुद्धीवर आला तेव्हां त्याच्या तोंडून प्रथम ' वंदे मातरम् ' हेंच घोषवाक्य निघालें.

कांतनें वंदे मातरम्करितां जे हाल सोसले त्यामुळेंच वंदे मातरम्ची चळवळ फोफावली व शेवटीं हैदराबाद सरकारला शाळेमधून वंदे मातरम् गीत म्हणण्याची अनुज्ञा द्यावी लागली. कांत वंदे मातरम् झाला. त्याचें नांव वंदे मातरम् पडलें. आजहि वंदे मातरम् म्हणूनच तो ओळखला जातो.

कठिन शब्दार्थ

आज्ञाधारक–वि. आज्ञाकारी, कौतुक करणें–क्रि. सराहना, धुष्टपुष्ट –वि. तगडा, संप–पु. हडताल, सर्वपरीनें–स. सब तरहसे, देईना– क्रि. न दे सकी, तेव्हां–अ. तब, ठरविलें–क्रि. तय किया, दहावींत– वि. दसवीं कक्षामें, निवड–स्त्री. चुनाव, बाणेदार–वि. आनपर जान देनेवाला, तुकडींत–स्त्री. कक्षामें, बनला–क्रि. हुआ, बना, छळ केला–क्रि. सताया, चाबकानी–पु. कोडेसे, बडविलें–क्रि. पीटा, उलट –अ. बदले, गणिक–अ. हर (कोडेपर), प्राणपणानें–पु. जी जानसे पाठपुरावा – पु. पीछा, बेशुद्ध–स्त्री. बेहोश, सोसलें–क्रि. सहे, फोफावली–क्रि. बढी, ओळखला जातो–क्रि. पहचाना जाता है ।

* * *

५७ : : भूदान

कथा २

'भूदान' यज्ञ पू. विनोबा भावे यांनीं १९४८ सालीं सुरू केला. हा यज्ञ धार्मिक आहे. कारण स्वेच्छेनें व श्रद्धेनें तो पूर्ण करावयाचा आहे. हा यज्ञ सामाजिक आहे. कारण सामाजिक शांतता आणि सुव्यवस्था या यज्ञांतून निर्माण व्हावयाची आहे. हा यज्ञ राजकीय आहे; कारण यानें राज्य संपन्न करावयाचें आहे आणि म्हणून भूदान यज्ञ धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय आहे.

भारत देश शेतीप्रधान आहे, शेती हाच येथील लोकांचा व्यवसाय आहे. हा व्यवसाय जर सुव्यवस्थित झाला तर भारतवर्ष सुवर्णभूमि झाल्याशिवाय राहणार नाहीं. शेतीचें विभाजन धड नाहीं. पुष्कळशा लोकांकडे खूप शेती आहे. यामुळें या लोकांकडील सर्व शेती वहीत होत नाहीं. कायद्यानें जर शेतीची पुनर्वाटणी झाली तर आपसांत मतभेद निर्माण होतील म्हणून या भूदान यज्ञाचें महत्त्व अधिक जाणवतें. भारतांतील सर्व शेती आधुनिक साधनांनीं व सामुदायिक रूपानें जर वहीत झाली तर—

(१) बेकारीचा प्रश्न सुटेल.

(२) सामुदायिक जीवन जगण्याची संवय होईल.

(३) यामुळें आपसांतील प्रेमसंबंध वाढतील.

(४) मतभेद टळतील.

(५) भारत देश उद्योगप्रधान व श्रमसहिष्णु बनेल.

आणि म्हणून पू. विनोबा भावे यांनीं हा यज्ञ सुरू केला आहे. ज्यांना स्वतःची जमीन नाहीं व ज्यांचा शेती हाच व्यवसाय आहे अशांनाच ते शेती देतात. या यज्ञांत सर्वांनाच सहभागी होतां यावें म्हणून भावेजी म्हणतात.

(१) ज्यांच्या जवळ जमीन आहे त्यांनीं भूमिदान करावें.

(२) ज्यांच्याजवळ शेती नाहीं पण धन आहे अशांनीं धनदान करावें.

(३) ज्यांच्याजवळ भूमि नाहीं व धनहि नाहीं पण शक्ति आहे अशांनीं श्रमदान करावें.

(४) भूमि, धन व श्रमहि ज्यांच्या जवळ नाहीं त्यांनीं मनदान द्यावें म्हणजे आशीर्वाद द्यावा.

हा यज्ञ संपन्न करतां यावा म्हणून सर्वांच्याकरितां सर्वांनीं झटावें या सद्‌भावनेनें हा यज्ञ सुरू केला आहे. पर्यायानें आमचेंहि हित या यज्ञामुळें होणार आहे, म्हणून आपण आजच भूदान यज्ञ यशस्वी करण्याकरितां यत्नशील होऊं या.

कठिन शब्दार्थ

सालीं–नपुं. वर्षमें, यज्ञांतून–पु. यज्ञसे, व्हावयाची–क्रि. होनेवाली, झाल्याशिवाय–क्रि. हुए बिना, धड–वि. ठीक, उचित, वहीत होणें–क्रि. जोतना, वांटणी–स्त्री. बँटवारा, विभाजन, सामुदाइक–वि. सामूहिक, जगण्याची–क्रि. जीनेका, संवय–स्त्री. आदत, टळतील–क्रि. टलेंगे, नष्ट होंगे, करतां यावा–क्रि. कर सकें, होऊं या–बनें.

* * *

५८ : : शिक्षण

कथा ३

शिक्षणानें जीवन संपन्न होतें. शिक्षणानें अज्ञान दूर होतें. शिक्षणानें चांगल्या संवयी जडतात. शिक्षणानें जगाची प्रगति कळते. शिक्षणानें आत्मज्ञान होतें. शिक्षणानें उद्योगशीलता वाढते. शिक्षणानें दुर्गुणांची जाणीव होते व सद्‌गुण आत्मसात कसे करावे हें कळतें.

म्हणून जीवनांत शिक्षणाचें फार मोठें स्थान आहे. शिक्षणाला ठराविक कालमर्यादा नसते. तें जन्मभर घ्यावयाचें असतें. ठराविक मर्यादेंत घेतलेलें पुस्तकी शिक्षण निरुपयोगी असतें. पुस्तकी शिक्षणानें जीवनाचे प्रश्न सुटत नाहींत. जीवन गुंतागुंतीचें असतें. अनेक बंधनांनीं तें व्याप्त असतें. अनेक प्रश्नांनीं तें गांजलेलें असतें. गुंतागुंती व गांजणुकींतून तें मुक्त करावयाचें असतें. ही मुक्तता पुस्तकी ज्ञानानें होत नाहीं. याकरितां प्रात्यक्षिक शिक्षण हवें.

प्रात्यक्षिक शिक्षण जीवनाशीं संबंधित असावें. जीवन जगण्याची कला प्रथम विद्यार्थ्यांना शिकवावी. जीवन जगत असतांना जे प्रश्न उत्पन्न होतील ते त्यांच्याकडूनच सोडवून घ्यावेत. यामुळें कल्पकता वाढेल व ती पूर्ण करण्याची शक्तिहि त्याबरोबरच निर्माण होईल. याच कल्पनेनें श्रीकृष्णानें अर्जुनाला रणांगणांत गीता सांगितली. ऋषींनीं बाल वयांत राम व लक्ष्मणाकडून यज्ञाचें रक्षण करविलें. राक्षसांना मारविलें.

मी कोण आहें, माझें कर्तव्य काय आहे, याची जाणीव प्रत्येकाला झाली पाहिजे. असें जर न झालें तर त्याचें एकाकी जीवन कष्टदायक होईल. जीवन हें एकाकीच असतें. कारण जन्म व मृत्यु हा एकट्यानेंच भोगावयाचा असतो, आणि म्हणून शिक्षण हें प्रात्यक्षिक व्हावें.

नुसत्या कल्पनेला जीवनांत कांहीं स्थान नसतें. कल्पनेचा अनुभव व विस्तार केल्यानेंच जीवन सुखी व संपन्न बनतें. जीवनाची सफलता ही शिक्षणावर अवलंबून असते. तेंव्हां शिक्षण अनुभवानें व प्रत्यक्ष-ज्ञानानें व्हावें.

कठिन शब्दार्थ

शिक्षण—नपुं. शिक्षा, पढाई, संवय—स्त्री. आदत, कळणें—क्रि. जानना, वाढणें – क्रि. बढना, जाणीव—स्त्री. अनुभव, ठराविक—वि. मर्यादित, घ्यावयाचे—घेणें, असतें—असणें—लेनी (प्राप्त करनी) होती है,

निरुपयोग–वि. निकम्मा, बेकार, सुटत–सुटणें–क्रि. हल होना, गुंतागुंत– वि. उलझन, गांजलेलें–गांजणें–क्रि. त्रस्त होना, हवें–क्रि. हो, चाहिये, असावें–असणें–हो, रहे, जगण्याची–जगणें – क्रि. जीना, कडूनच–अ. द्वाराही, सोडवून–सोडविणें–क्रि. हल करना, रणांगण–नपुं. लडाईका मैदान, सांगितली–सांगणें–क्रि. कहना, करविलें–करणें क्रि. करना, मारविलें–क्रि. मरवाया, कोण–स. कौन, एकाकी–वि. तनहा, कष्टदायक–वि. दुःखप्रद, नुसत्या–नुसता–अ. केवल, विस्तार –पु. फैलाव

* * *

५९ : : माझें गांव

कथा ४

मी बी. ए. झालों. नोकरीच्या उद्देशानेंच मला कॉलेजचें शिक्षण दिलें. पण वडील वारल्यामुळें कर्मधर्मसंयोगानें मला गांवींच राहावें लागलें. संसाराचा भार मजवर पडला. घरीं शेती बरीच होती. गांवीं राहण्यानेंच तिचें उत्पन्न वाढणार होतें. शेती पुरेशी असल्यामुळें, नोकरी मिळत नसल्यामुळें व शेतकऱ्यांना सरकार साहाय्य देत असल्यामुळें शेती करण्याचेंच मीं ठरविलें. मी शेतकरी झालों.

मी सुसंस्कृत, शिकलेला शेतकरी असल्यामुळें प्रथम प्रथम इतर शेतकरी माझ्याशीं बिचकून वागत. पण हळूहळू ते माझ्यांत रमले व मी त्यांच्याशीं एकरूप झालों.

शाळा, दवाखाना, वाचनालय, रेडिओ आदि आधुनिक साधनांनीं माझें गांव मला थोड्याच दिवसांत भूषवितां आलें. साहचर्यानें गांवांत एकोपा निर्माण झाला. यामुळें आपोआपच गांवाची रचना, आरोग्य व मैत्रींत वाढ झाली.

माझ्या गांवांत पाण्याचा दुष्काळ नाहीं.
माझ्या गांवांत धान्याची कमतरता नाहीं.
माझ्या गांवांत भांडणें होत नाहींत.
माझ्या गांवांत आजार प्रवेश करीत नाहीं.
आजाराला थारा मिळत नाहीं.
लोक अनेक लहानमोठे ग्रामीण उद्योग करतात.
यामुळें माझें गांव स्वयंभू झालें.
गांवाचा कारभार गांवकरीच करतात.
भांडणें, मतभेद, अडीअडचणी गांवकरीच प्रेमानें दूर करतात.
गांवाचे शास्ते गांवकरीच आहेत.
यामुळें माझें गांव आदर्श झालें.

मला तें प्राणापेक्षांहि प्रिय आहे. मात्र मी नेहमीं कुठल्याहि गोष्टीचें नेतृत्व आपण होऊन पत्करीत नाहीं. तरी पण हळू हळू तें मजकडेच येत आहे. माझ्या या वागण्यामुळें माझ्या शेतांतील शेतकरी व मजूर मोठ्या प्रेमानें कामें करतात आणि त्याचेंच फळ कीं काय माझें उत्पन्न तीस हजार रुपये झालें आहे. माझें गांव शहराचा नमुनाच आतां झालें आहे. या सर्व गोष्टीला कारण जर कोणतें असेल तर तें एकच आहे आणि तें म्हणजे—

'जो काम करतो तो खातो व जो रिकामा राहतो तो उपाशी मरतो' हा दंडक आमच्या गांववाल्यांनीं आपल्यावर लादून घेतला.

काशीरामसिंग हजारे
हैदराबाद राज्य

कठिन शब्दार्थ

वारल्यामुळें—वारणें—क्रि. मरजानेके कारण
पुरेशी—अ. काफी
कमतरता—स्त्री. कमी
भांडणें—भांडण—नपुं. झगडा
आजार—पु. बीमारी

शेतकरी–पु. किसान
झालों–होणें–क्रि. हुआ
बिचकून–वि. बिना गलतीके
वागत-वागणें–क्रि. बरताव करते
रमले–रमणें–क्रि. रममाण होना
एकोपा–पु. एकी–स्त्री. ऐक्य
आपोआप–अ. अनायास, सहज
दुष्काळ–पु. अकाल
थारा–पु. आधार
कारभार–पु. कारोबार
अडीअडचण–स्त्री. समयअसमय, सुविधा असुविधा
कीं काय–अ. न जाने
दण्डक–पु. सिद्धान्त
लादून–क्रि. लादकर

* * *

६० : : म्हणी

[मुहावरे और कहावतें भाषाका प्राण हैं। अन्यत्र मुहाविरे दिये गये हैं। अब यहाँ कहावतें दी जाती हैं। मात्र हिंदी कहावतोंको यहाँ प्राधान्य दिया गया है। जिनका पर्याय मराठी कहावतों द्वाराही दिया गया है। अध्ययनके लिये कतिपय कहावतोंका उपयोगभी किया गया है।]

(१) हाथकंगनके लिये क्या आरसी।

हातच्या काकणाला आरसा कशाला ?

चंद्रकांत उद्यांपरवां गांवाहून येईल. तो आला म्हणजे सर्व कांहीं कळेल. हातच्या काकणाला आरसा कशाला ?

(२) ऊँची दूकान फीका पकवान।

नांव सोनूबाई व हातीं कथलाचा वाळा.

देशपांडेची स्थिति "नांव सोनूबाई नि हातीं कथलाचा वाळा" यासारखी झाली आहे. त्याच्या जवळ आतां एक पैहि राहिली नाहीं.

(३) गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास ।

वारें वाहील तशी पाठ फिरविणें.

रामेश्वर वारे वाहील तशी पाठ फिरविण्यांत मोठा वस्ताद आहे.

(४) अधजल गगरी छलकत जाय ।

उथळ पाण्याला खळखळाट फार.

गंगाधर बोलका आहे म्हणून त्याच्याविषयीं लोक हें समजतात कीं उथळ पाण्याला खळखळाट फार. पण तसें नव्हे, तो फार गंभीर आहे.

[ऊपरकी चार कहावतोंके समान निम्न कहावतोंका वाक्योंमें प्रयोग कीजिये]

(५) कहाँ राजा भोज कहाँ गंगू तेली ।

कुठें इंद्राचा ऐरावत नि कुठें शामभटाची तट्टाणी.

(६) जिसकी लाठी उसकी भैंस ।

ज्याच्या हातांत ससा तो पारधी.

(७) ते तो पाँव पसारिये जेती चादर होय ।

हंथरूण पाहून पाय पसरणें.

(८) कंगालीमें आटा गीला ।

दुष्काळांत तेरावा महिना.

(९) काटो तो खून नहीं

पांढरा फक्क, सर्द.

(१०) खोदा पहाड निकली चुहिया ।

डोंगर पोखरून उंदीर काढणें.

(११) दिमाग ठिकाणे आना ।

वठणीवर येणें.

(१२) चिराग तले अंधेरा ।

दिव्याखालीं अंधार.

(१३) गुडपर मक्खियाँ टूटना ।

गुळाला मुंगळे चिकटणें.

(१४) लोटपोट हो जाना।
हंसून हंसून मुरकुंडी वळणें.

(१५) न लगे हर फिटकिरी और रंग चोखा!
परस्परा पावणें बारा.

(१६) सुईके छेदमेंसे निकल जाना।
सहीसलामत सुटणें.

(१७) मजा किरकिरा होना।
आनंदावर विरजण पडणें.

(१८) लहूका घूँट पीकर रह जाना।
अपमान गिळणें.

(१९) मुँहके बल गिर पडना।
तोंडघशी पडणें, मूग गिळणें.

(२०) बारूदके ढेरपर दिया सलाई।
आगींत तेल.

(२१) अंधेके हाथ बटेर लग जाना।
घबाड साधणें.

(२२) चोरी और सीना जोरी।
चोर तो चोर आणि वर शिरजोर.

(२३) कलेजा मुँहको आना।
प्राण कंठाशीं येणें.

(२४) घीके चिराग जलाना।
दिवाळी साजरी करणें.

(२५) दूरके ढोल सुहावने।
दुरून डोंगर साजरे.

(२६) बंदर क्या जाने अदरकका स्वाद ।
गाढवाला गुळाची चव काय ?
(२७) धोबीका कुत्ता न घरका न घाटका ।
त्रिशंकु.
(२८) नंगी क्या न हो एगी क्या नीचो डेगी ?
ज्याच्या शेती नाहीं माती तो काय पिकविणार माती?
(२९) नानीके आगे ननिहालकी बातें ।
आजीपुढें आजोळच्या गोष्टी.
(३०) सौ चूहे खायके बिल्ली चली हजको ।
करून करून भागले नि देवपुजेला लागले.
(३१) फटकचंद गिरधारी, पास न लोटा, पास न थाली ।
बारा पिंपळावरचा मुंजा.
(३२) सीधी ऊँगलीसे घी नहीं निकलता है ।
सरळपणानें काम होत नाहीं.
(३३) आगसे निकला और चूल्हेमें गिरा ।
आगींतून निघाला आणि फुफाटयांत पडला.
(३४) लेना एक न देने दो ।
घेणं नास्ति देणं नास्ति.
(३५) मुल्लाकी दौड मसजिद तक ।
सरडयाची धांव कुंपणापर्यंत.
(३६) मरता क्या नहीं करता
मेलेलें कोंबडें आगीला भीत नाहीं.
(३७) बकरीकी जान गयी, खानेवालेको मजा न आयी ।
शेळी गेली जिवानिशीं खाणार म्हणतो वातड.
(३८) जो गरजता है वह नहीं बरसता है ।
गर्जेल तो पडेल काय ?

(३९) चलती गाडीमें रोडा अटकाना।
चालत्या गाडीला खीळ घालणें.

(४०) गोदमें लडका शहरभर ढिंढोरा।
हातांत कळसा गांवाला वळसा.

कठिन शब्दार्थ

काकण—नपुं. चूडी, कंगन
आरसा—पु. आईना
कथील—नपुं. एक सामान्य धातु
वारें—नपुं. हवा
वाहणें—क्रि. बहना
उथळ—वि. ओछा
खळखळाट—पु. पानीका बहाव
ऐरावत—पु. हाथी
तट्टाणी—स्त्री. घोडी
ससा—पु. खरगोश
हंथरूण—नपुं. बिछौना
पोखरणें—क्रि खोदना
वठणीवर—वि. रास्तेपर
चिकटणें—क्रि. सटना
परस्परा—पु. दूसरोंसे
विरजण—नपुं. आवरण
गिळणें—क्रि. निगलना
चव—स्त्री. स्वाद, रुचि
माती—स्त्री. मिट्टी
आजोळ—नपुं. ननिहाल
गोष्ट—स्त्री. बात, कहानी
भागले—क्रि. थक गये
पिंपळ—पु. पीपल
मुंजा—पु. एक देवता
फुफाटा—पु. धूल
धाव—स्त्री. दौड
कुंपण—नपुं. बाढ
कोंबडा. पु. मुर्गा
शेळी—स्त्री. बकरी
खीळ—स्त्री. रोडा
कळसा—पु. घडा
वळसा—पु. चक्कर

* * *

हम जिस प्रांतमें रहते हैं वह आर्यानिवासी प्रांत है। आर्योंकी भाषाको संस्कृत, गीर्वाण या देवभाषा कहते हैं। इन्हीं भाषाओंका प्राकृतरूप मराठी भाषा है।

संस्कृत मंजी हुई नियमबद्ध भाषा है। इसलिये इस भाषामें कोई फरक नहीं हुआ। द्रविड और आर्य जातीके संपर्क से लोकव्यवहारकी भाषामें जो परिवर्तन होते गये वे अभी भी जारी हैं। स्वयं मराठीके भी कई रूप हैं। पुणेंकी मराठी, कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी, नागपुरी आदि प्रकार मराठी भाषाके भी पाये जाते हैं। पुणेंकी भाषा अधिक स्पष्ट, शुद्ध और मंजी हुई मानी जाती है।

आर्य भाषाका साधार इतिहास आज उपलब्ध नहीं है। बौद्ध धर्मका प्रचार इ. स. पूर्व छटी शताब्दिमें भारतवर्षके कोनेकोनेमें हुआ था। उन दिनोंमें लिखे गये शीलालेखोंसे पता चलता है कि प्राकृत भाषाएँ उस समय प्रचलित थीं। जैन, बौद्ध, धर्मके प्रचारवाङ्मयसे पता चलता है कि आठवी शताब्दितक ये भाषाएँ रायज थीं। लगभग दसवीं शताब्दिमें जिन प्राकृत भाषाओंका रूप निर्धारित हुआ उन्हीमेंसे हिंदी, गुजराथी, मराठी भाषाओंके पूर्वरूप पैदा हुए। १ आर्य भाषा, २ प्राकृत, ३ तथा देशभाषाएँ ये भाषाओंका क्रम है।

लोकभाषाओंका स्वरूप दिनप्रतिदिन सुगमताके कारण बदलता है परंतु संस्कृत भाषाका न कभी बदला और न बदल सकता है। देशी भाषाओंका जन्म संस्कृतसे हुआ। संस्कृतमें शब्दसंपात्ति पर्याप्त है, और वह व्याकरणबद्धभी है। इसीलिये भाषाविषयक जो भी प्रश्न उपस्थित होंगे वे संस्कृतद्वाराही सुलझ सकते हैं।

महाराष्ट्री

सभी देशी भाषाओंके साथ याने आठवी शताब्दिमें मराठीने (महाराष्ट्री) भी जन्म लिया है। यह भाषा वऱ्हाड प्रांत, खानदेश प्रांत,

कोकण प्रांत और महाराष्ट्र प्रांतमें तथा सागर, जबलपूर, देवगड विभागोंमें प्रचलित थी। दसवीं शताब्दितक इस भाषाको महाराष्ट्री कहते थे। आज वह मराठीके नामसे परिचित है। आजकी मराठी भाषापर महाराष्ट्रीका असर करीब १६ वीं शताब्दितक था।

मराठीके नियम, ढाँचा, ढंग, रूप संस्कृतोद्भव है। परिस्थितिके अनुसार भाषामें फरक होताही रहता है। संस्कृतके कई शब्दोंको, रूपोंको और नियमोंको मराठीने अपनाया है। कहीं अपभ्रंश, कहीं तद्भव, कहीं तत्सम रूपोंकोही मराठीने अपनाया है।

मुसलमानोंके जमानेमें मराठीपर अरबी, फारसी का प्रभाव था। अंग्रेजोंके जमानेमें अंग्रेजीका था और आज मराठीपर हिंदी भाषाका प्रभाव है। सीमाप्रांतीय भाषाएँ हमेशा मिश्रित हुआ करती हैं। दिन प्रतिदिन भाषाका स्वरूप परिणत और आसान होता रहता है। मात्र यह सब संस्कृतहीके कारण होता है और होता रहेगा। क्यों कि संस्कृत अमर है।

भाषा-काल

सुगमताके लिये प्रचलित मराठी भाषाके पाँच कालखण्ड निर्धारित हो सकते हैं।

प्रथम काल— प्रारंभसे सन १५५० तक। संत ज्ञानेश्वरजी, मुकुंदराय, नामदेव आदि संतोंका साहित्य बडाही रोचक और भक्तिमार्गी है वह काव्यरूपमें अत्यधिक पाया जाता है।

दूसरा काल—१५५० ता १६५० तक। संतकवि एकनाथ, मुक्तेश्वर, रघुनाथपंडित, आनंदतनय, विठ्ठल, श्रीधर आदि संतोंके अनुभव और मार्गदर्शन काव्यद्वारा हम पा सकते हैं।

तीसरा काल—सन १६५० ता १७५० तक। इस कालमर्यादामें समर्थ रामदास, संत तुकाराम, वामन आदि महापुरुषोंके दर्शन हमें होंगे।

चौथा काल— १७५० ता १८५० तक। इस अवधिमें कवि मोरोपंत, महिपतीबुवा, अमृतराय, रामजोशी, अनंतफंदी आदि महानुभाव हुए हैं।

पाँचवा काल—सन १८५० ता आज तक याने प्रचलित कालखण्ड। इस कालखण्डमें चिपळूणकर, लोकमान्य तिलक, केळकर, आगरकर, डॉ. केतकर, नाथमाधव आदि लेखक और कवि स्वर्गस्थ हो चुके हैं। वीर सावरकर, आपटे, फडके, खांडेकर, सरदेसाई, माडखोलकर आदि अनेक लेखक और कवि इस कालखण्डमें हैं। सन १९३५ के बाद आधुनिक काल।

मराठी तीन करोड लोगोंकी मातृभाषा है। समूचे भारतवर्षमें महाराष्ट्रीय बिखरे हुए हैं। इस तीन करोडके अतिरिक्त कोंकणी आदि भाषीय हैं। भाषावार प्रांतरचना जब होगी तब महाराष्ट्र, बृहन्महाराष्ट्रमें परिवर्तित होकर विशाल महाराष्ट्र बन जाएगा।

मराठी साहित्य हमेशा तुलनात्मक, रोचक और मधुर रहा है। संशोधक अनुसंधान करनेकी प्रवृत्ति महाराष्ट्रमें अधिक पाई जाती है। भाषाविषयक सभी विभागोमें योग्यतापूर्वक लिखा जाता है और ये लेखनभी सफल होता है। मराठीका इतिहास, गुणधर्म, संस्कृति, शूरता का प्रत्यक्ष दर्शन आप तभी कर सकेंगे जब मराठी सीख जाएँगे।

अभ्यास

मराठीमें उत्तर दीजिए—

१. यदि गोग्रासकी प्रथा न होती तो रागिणी अपना जीवन किस प्रकार व्यतीत कर सकती? क्या उसका जीवन सफल होता? वह कैसे?

२. क्या मराठी लिपि सुधारका ढंग ठीक है?

३. सहवासोत्तर विवाहमें जो विचार प्रदर्शित किये हैं, क्या इन विचारोंसे आप सहमत हैं? नहीं तो क्यों नहीं?

४. हिंदी भाषाका इतिहास ५ पृष्ठोंमें लिखिए।

[निम्न प्रश्नोंके उत्तर मराठीमें दीजिये]

१ राष्ट्र म्हणजे काय? त्याचीं लक्षणें कोणतीं?

२ भाषा, संस्कृति, इतिहास, भौगोलिक मर्यादा व धर्म या दृष्टीनें भारत हें राष्ट्र होऊं शकेल काय?

३ हिंदी राष्ट्रभाषा म्हणून ठरविण्याचा कोणीं यत्न केला?

४ देशी भाषेंतील परकीय रूढ शब्द काढून टाकावेत काय?

५ हिंदी भाषेंत किती प्रतिशत परकीय शब्द आहेत?

६ नवीन शब्द घेणें झाल्यास कोणत्या भाषेंतून घ्यावेत व कां?

* * *

६२ : : शब्दसाम्य व अर्थभिन्नता

[हिंदी और मराठीवालोंके लिये मार्गदर्शक शब्दसंग्रह]

साँस—स्त्री. श्वास पु.

सांड पु.—पोळ पु.

अगूठा पु.—आंगठा पु.

छाता पु.—छत्री स्त्री.

घडा पु.—घागर स्त्री.

घडियाल पु.—मोठी घंटा स्त्री.

मगर पु.—सुसर स्त्री.

छडा पु.—एकटा पु.

माली पु.—माळी पु.

चौपट वि.—नष्ट वि.

यात्रा स्त्री.—प्रवास पु.

चेष्टा स्त्री.—प्रयत्न पु.

सास स्त्री.—सासू स्त्री.

सांडनी स्त्री.—उंटाची मादी स्त्री.

अंगूठी स्त्री.—अंगठी स्त्री. अंगीठी—शेगडी स्त्री.

छत पु.—गच्ची स्त्री.

घड़ी स्त्री.—घड्याळ नपुं.

घडियाल पु.—मगर, सुसर स्त्री.

मगर अ.—परंतु अ.

छडी स्त्री.—छडी स्त्री.

माला स्त्री.—माळ स्त्री.

चौगुना वि.—चौपट वि.

मेला पु.—यात्रा स्त्री.

दिल्लगी स्त्री.—चेष्टा स्त्री.

शिक्षा स्त्री.–शिक्षण नपुं.
जलसा पु.–सभा स्त्री.
कोई–सर्व. कोणी
गर्मी स्त्री.–उष्णता स्त्री.
जाडा पु.–हिवाळा पु.
भारी वि.–जड वि.
रोडा पु.–व्यत्यय पु.
दादा–पु. आजोबा (मराठींमें बडा भाई)
पेरना क्रि.–गाळणें. क्रि.
शहद पु.–मध. पु.
कमरे–पु. खोल्या स्त्री.
बोरे पु.–पोतीं नपुं.
कम वि.–थोडें वि.
दिन पु.–दिवस पु.
नशा स्त्री.–निशा स्त्री.
पता पु.–पत्ता पु.
क्यों–कां
दूर वि.–लांब वि.
कै स्त्री.–वांती स्त्री.
झाड पु.–मोठें रोपटें नपुं.

सजा स्त्री.–शिक्षा स्त्री.
बैठक स्त्री.–(गानेकी) जलसा पु.
कुछ अ.–कांहीं अ.
गर्मी स्त्री.–उन्हाळा, उकाडा पु.
मोटा पु.–जाडा, लठ्ठ पु.
जड स्त्री.–मूळ नपुं.
आपत्ति स्त्री.–संकट नपुं.
दादी–स्त्री. आजी स्त्री.

बोना–क्रि. पेरणें (बी) क्रि.
शहीद पु.–हुतात्मा पु.
कमरें स्त्री.–कंबरा स्त्री.
बेर पु.–बोरें नपुं.
कमी–वि. उणेपणा
दीन–वि. गरीब
निशा स्त्री.–रात्र स्त्री.
पत्ता पु.–पान नपुं.
क्या–काय
दूरी–स्त्री. अंतर
कई–वि. कित्येक
पेड पु.–झाड नपुं.

अनुस्वार अंकित शब्दार्थ

ज़रा–थोडें
सज़ा–दण्ड, शिक्षा
ख़ाना–स्थान, ठिकाण
तेज़–जलद, गति

जरा–म्हातारपण
सजा–सजव
खाना–जेवण
तेज–प्रकाश

क़िला–किल्ला	कीला–खिळा
गुल–नाहींसा	गुल–फुल
गंज़–मोजण्याचा 'गज'	गज–हत्ती
ज़माना–काळ, वेळ	जमाना–जमविणें, लगाविणें
बाग़–उद्यान	बाग–लगाम
बाज़–कांहीं	बाज–एक पक्षी
नाज़–गर्व	नाज–अनाज
राज़–रहस्य, राज़–गवंडी	राज–राज्य
दाग़–कलंक	दाग–नग, डाग

[इन शब्दोंसे नुक्तेका महत्त्व क्या है यह आप जान सकते हैं। फिरभी मराठीमें यह बंधन या सुविधा नहीं है।]

प्रश्न–पत्र २

१ ला प्रश्न—आपल्या वडिलांस एक पत्र लिहून सहलीकरितां (सैरके लिये) पन्नास रुपये मागवा.

२ रा प्रश्न—'गरिबी हें पाप नव्हे' या विषयावर २५ ओळी निबंध लिहा.

३ रा प्रश्न—दिल्लीची माहिती थोडक्यांत लिहा.

४ था प्रश्न—एका शेतकऱ्याच्या वेषभूषेचें वर्णन करा.

५ वा प्रश्न—महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांचा परिचय करून द्या.

६ वा प्रश्न—मराठी व हिंदी भाषेंतील अंतर व साम्य सांगा.

७ वा प्रश्न—लिपीच्या सुधारणेबद्दल तुमचें काय मत आहे ?

८ वा प्रश्न—गाय, तुळस यांना आम्ही कां गौरवितों हें सांगा.

९ वा प्रश्न—महाराष्ट्राबद्दल तुमचें काय मत आहे ?

१० वा प्रश्न—मराठी शिकून तुम्ही काय करणार ? थोडक्यांत लिहा.

११ वा प्रश्न—बैलाची उपयुक्तता लिहा.

समाप्त

दोषभाजन अर्थात् शुद्धिपत्र

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
१४	१०	(पाठ-क्रमांक) ८	७
२१	२५	जबनपर	जबानपर
२२	१२	गडरियाकी	गडरियोंकी
२८	शब्दार्थ १	मेर	मेरा
३५	१	बारम	बारेमें
३६	८	वाहानुसार	अनुसार
३६	१९	कारान्त	एकारान्त
३६	२४	ान	लहान
४०	१०	हमे	हम
४२	९	संज्ञाओंके	संज्ञाओंको
७०	१२	ए. व., द्वितीयाका	ए. व, 'ला' द्वितीयाका
७०	२१	प्रत्यय	रूप
७५	१२	पडणारे	पाडणारे
९८	१६	बनाना	बनना
१०५	११	भीती	भाँति
१०६	६	हिंदी आहेत	आहेत
११५	११	वाटवी	वाटती
१२०	१५	कचमूरके	कचूमरके
१२१	२३	गूड	गुड
१२३	१६	जानता	जाणतां

• • •

किंमत : रु. ३·५०

चित्रशाळा प्रकाशन